मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेची 5 अनधिकृत होर्डिंगवर कारवाई

## 'इ' क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील एकूण 5 अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत जाहिरात फलक निष्कासनाची कारवाई आजपासून सुरू करण्यात आली असून 'इ' क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील एकूण ५ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच येत्या तीन दिवसांत शहरातील उर्वरित अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने शहरातील जाहिरात फलकांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणामध्ये आतापर्यंत अ (३), ब (५), क (३), ड (२), इ (५), फ (६) असे मिळून क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण २४ अनधिकृत फलक आढळले असून वाढीव ३२१ जाहिरात फलक आढळले आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातील होर्डिंग्सबाबत महापालिका अधिकारी, जाहिरात फलक धारक यांच्यासमवेत शुक्रवार १७ मे रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत आयुक्त शेखर सिंह यांनी फलकधारकांना अनधिकृत जाहिरात फलक दोन दिवसात हटविण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांना पुढील कारवाई करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनधिकृत फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या, या कारवाईस आजपासून सुरूवात झाली.

३०X२० चे २ फलक ४०X२० चे २ फलक १५X२० चा १ फलक असे एकूण ५ फलक आजच्या कारवाईत निष्कासित करण्यात आले. या कारवाई दरम्यान सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त संदीप खोत, कार्यालय अधिक्षक ग्यानचंद भाट, परवाना निरीक्षक, मजूर, एमएसएफ जवान तसेच महापालिका सुरक्षा रक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

### क्षेत्रीय अधिकाऱ्यांना फेरपडताळणीबाबत सूचना

» आज सकाळी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आकाशचिन्ह परवाना विभाग, शहर अभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत बैठक झाली. त्यावेळी त्यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी बुधवारपर्यंत आपआपल्या प्रभागातील अनधिकृत होर्डिंग्सचे सर्वेक्षण करण्याच्या व फेरपडताळणी करण्याच्या सूचना दिल्या.

### ३१ मे २०२४ पर्यंत होर्डिंग्स परवानाचे नूतनीकरण करावे अन्यथा कारवाई

२०२४-२५ साठी होर्डिंग्स परवाना नूतनीकरण ३१ मे २०२४ पर्यंत करावे अन्यथा सदरचे होर्डिंग्स अनधिकृत समजून निष्कासनाची कारवाई करण्यात येईल अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

### २ कनिष्ठ संरचना अभियंत्यांची करण्यात येणार नेमणूक

शहर अभियंता कार्यालयामार्फत स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेटचा नमुना तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच फलक उभारण्यात आलेल्या जागेवर पाहणी करण्यासाठी २ कनिष्ठ संरचना अभियंत्यांची नेमणूक महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. यामुळे जाहिरात फलकाच्या संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासही मदत होणार आहे.

# पवना धरणात अवघा 28 टक्के पाणीसाठा शिल्लक

## मागील साडेचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरु : पाणीसाठा जूनअखेर पुरेल एवढाच



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागवणाऱ्या पवना धरणात सध्यस्थितीत केवळ २८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. हा पाणीसाठा जूनअखेर पुरेल एवढाच आहे. गतवर्षीपेक्षा धरणातील पाणीसाठा यावेळेस कमी झाला आहे. त्यामुळे जूनमध्ये पावसाने ओढ दिल्यास शहरावर आणखी पाणी कपातीचे संकट ओढवण्याची शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मागील साडेचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहराची सध्याची सुमारे ३० लाख लोकसंख्या आणि भविष्यातील ३० वर्षातील लोकसंख्या वाढीचा विचारात घेऊन पालिकेने आंद्रातून शंभर एमएलडी व भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आणण्यात येत आहे. त्या पाण्यावरील प्रक्रियेसाठी चिखलीत जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. आंद्रा धरणातून केवळ ५० एमएलडी पाणी निघोजे येथील बंधाऱ्यातून पाणी उचलून समाविष्ट भागातील नागरिकांना देण्यात येत आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत असून, तक्रारींमध्ये वाढ होत आहे.

तसेच पवना धरणात सध्या २८ टक्के पाणीसाठा असून हा साठा जून अखेरपर्यंत पुरेल एवढा आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेला ३०.९२ टक्के पाणीसाठा होता. मागील वर्षीपेक्षा दोन टक्क्यांनी पाणीसाठा कमी आहे. दरम्यान, पवना आणि आंद्रा धरणातील पाणी जूनअखेर पुरेल एवढा उपलब्ध आहे. पण, जूननंतर पावसाने ओढ दिल्यास शहरावर पाणी कपातीचे संकट येणार आहे. त्यावेळेस निश्चितपणे पाणी कपात करावी लागेल. तसेच शहरातील अनेक गृहनिर्माण संस्थांना टँकरद्वारे पाणी घ्यावे लागते. प्रतिमाणसी दरडोई १३५ लिटर या निर्धारित मानकाप्रमाणे पाणी दिले जाते. ज्यांना जास्त पाणी लागते, ते खासगी टँकरच्या माध्यमातून पाणी घेत आहेत.

# पबच्या संख्येबाबत महापालिकाही अनभिज्ञ

## अनधिकृत ‘रूफटॉप’ हॉटेल्सवर कारवाईचे महापालिकेकडून पोलिसांना पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर येथे झालेल्या भीषण अपघातानंतर शहरातील पबचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच पबच्या संख्येची कोणतीही नोंद महापालिकेकडे नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बांधकाम नियमानुसार केवळ रेस्टॉरंट सुरू करण्यास महापालिका मान्यता देते. त्यामुळे तेथे पब सुरू आहे की नाही, याची माहिती नाही. पबची माहिती पोलीस किंवा जिल्हा प्रशासनाकडे असेल, असे सांगत महापालिका प्रशासनाने हात झटकण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

रूफटॉप हॉटेलची माहितीची नोंद असून अनधिकृत रूफटॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यासंदर्भात जानेवारी महिन्यातच पोलिसांना पत्र दिल्याचेही महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.



कल्याणीनगर भागातील पबमधून निघालेल्या तरुण-तरुणीला भरधाव मोटारीने रविवारी पहाटे धडक दिल्याने तरुण-तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पबची संख्या किती यासंदर्भात महापालिकेकडे माहिती घेतली असताना पबची कोणतीही नोंद नसल्याचे पुढे आले. पबची स्वतंत्र नोंद ठेवली जात नाही. रेस्टारंट सुरू करण्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर महापालिका परवानगी देते. त्यामुळे तेथे काय सुरू आहे, याची माहिती महापालिकेकडे नाही, असा दावाही करण्यात आला.

रूफटॉप हॉटेल्सची आकडेवारी महापालिका प्रशासनाकडे आहे. शहरात एकूण ८९ अनधिकृत रूफटॉप हॉटेल्स आहेत. त्यापैकी ७ हॉटेल्सना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९४९ चे कलमअंतर्गत नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. यातील ५३ रूफटॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यात आली आहे. तर, सहा हॉटेल मालकांनी स्वत:हून बांधकाम काढून घेतले आहे. सात हॉटेल्सचा वापर बंद असून, सात रूफटॉप हॉटेल्सबाबत स्टे ऑर्डर देण्यात आली आहे. तर नऊ हॉटेल्सवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून देण्यात आली.

शहरातील अनधिकृत रूफटॉप हॉटेल्ससंर्भात कारवाई करावी, असे पत्रही महापालिकेच्या बांधकाम विभागाने जानेवारी महिन्यात पोलिसांना दिले आहे. अस्तित्वातील अधिकृत इमारतीच्या टेरेसचा वापर आणि अनधिकृत रूफटॉप किंवा टेरेस हॉटेल्ससाठी होत आहे. इमारतीच्या दर्शनी बाजूच्या सामासिक अंतरामध्ये तात्पुरत्या कच्च्या, पक्क्या स्वरूपाचे पत्राशेड टाकून तर काही ठिकाणी इमारतीच्या पार्किंगमध्ये तसेच निवासी मिळकतींच्या वापरात बदल करून हॉटेल्स सुरू करण्यात आले आहेत. हॉटेल्ससाठी पार्किंगबाबतही पूर्तता करण्यात आली नसल्याने रस्त्यावर वाहने लावली जात असून वाहतूक कोंडीचा प्रश्नही निर्माण होत आहे. तर मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपकांचा वापर होत असल्याने ध्वनी प्रदूषण होत आहे. त्यामुळे अनधिकृत हॉटेल्सवर कारवाई करावी, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# पोर्श अपघात प्रकरणी मोठी अपडेट!

## पुणे पोलिसांकडून अल्पवयीन आरोपीच्या वडिलांसह बार मालक आणि मॅनेजरलाही अटक

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणी नगर जंक्शन भागात रविवारी पहाटे नंबरप्लेट नसलेल्या पोर्श कारने मोटरसायकलला धडक दिली होती. या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आता पुणे पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीच्या वडिलांसह बार मालक आणि मॅनेजरला अटक केली आहे.

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने सोमवारी त्याच्या वडिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, तेव्हापासून ते फरार होते. पोलिसांकडून त्यांच्या शोध सुरू होता. यादरम्यान आज पहाटे त्यांना छत्रपती संभाजीनगर भागातून अटक करण्यात आली. याशिवाय बार मालक आणि मॅनेजरलाही अटक करण्यात आली. आरोपी १७ वर्षांचा अल्पवयीन असतानाही त्यांनी त्याला मद्य दिले, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.



रविवारी पहाटे झालेल्या या अपघातानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले होते. त्यानंतर रविवारी दुपारी त्याला विशेष हॉलिडे कोर्टात हजर केले होते. त्याची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात यावी तसंच आरोपी साडेसतरा वर्षांचा असल्याने त्याला प्रौढ समजून खटला चालवला जावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत आरोपीला जामीन मंजूर केला होता. तसेच अपघातावर ३०० शब्दाचा निबंध लिहावा, असे आदेश दिले होते.

### कायद्यानुसार कारवाई केली जाईल – अमितेश कुमार

यासंदर्भात बोलताना पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आरोपीवर कायद्यानुसार कारवाई केली जात असल्याचे सांगितले होते. “कल्याणीनगर भागात काल घडलेली घटना अंत्यत दुर्दैवी आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी दारू पिऊन कार चालवित होता. ही बाब स्पष्ट झाली असून या प्रकरणी आम्ही पब मालक, आरोपीचे वडील आणि विना नंबर प्लेट गाडी देणाऱ्या शो रूमच्या मालकावर गुन्हा दाखल केला आहे. तसेच आरोपी हा कागदपत्रांच्या आधारे अल्पवयीन असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्याला न्यायालयाने काही अटींच्या आधारे जामीन दिला आहे. पण हा मुलगा खरच अल्पवयीन आहे का? याबाबतचा तपास आमची टीम शाळेत जाऊन करत आहे.” अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली होती.

याशिवाय “आम्ही आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहोत, अशी चर्चा होत आहे. पण आम्ही सर्व प्रकाराची कलम लावली आहेत. तरी देखील कोणी चर्चा करीत असेल तर समोरासमोर चर्चा करण्यास तयार आहोत, तसेच या प्रकरणी आम्ही कोणालाही सोडणार नाही. कायद्यापुढे सर्वजण समान आहेत”, असं स्पष्टीकरणही त्यांनी दिलं होतं.

### देवेंद्र फडणवीसांनीही घेतली दखल

» राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या अपघाताची दखल घेत आरोपीवर कठोर कारवाईचे आदेश दिले होते. तसेच या अपघातातील आरोपीला जामीन मिळाला असला तरी त्याविरुद्ध अपील दाखल करण्याच्या सूचना पुणे पोलीस आयुक्तांना दिल्या असल्याची माहिती त्यांनी दिली होती. याबरोबरच या प्रकरणातील आरोपीला कोणती विशेष ट्रिटमेंट दिली असल्यास त्यावेळचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासून ते खरे असेल तर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करा, असे निर्देश देखील त्यांनी दिले होते.

# महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान

## माहिती अधिकार कायद्यांतर्गत उजेडात : फौजदारी खटले दाखल करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महावितरण तळवडे शाखा अभियंता यांनी संगनमताने 40 घरगुती व व्यापारी वीज जोड देताना प्रति वीजजोडकरिता निर्धारित रक्कम भरुन न घेता कमी शुल्कात वीज जोड दिले. अधिकारी, शाखा अभियंता यांनी संगनमताने महावितरणचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याची धक्कादायक माहिती पिंपरी-चिंचवड इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे सचिव नितीन बोंडे यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत उजेडात आणली आहे.

या प्रकरणी दोषी अधिकारी व अभियंते यांच्यावर फौजदारी खटले दाखल करून या अधिकारी व अभियंता याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी सचिव नितीन बोंडे यांनी महावितरणकडे केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महावितरणच्या भोसरी विभागीय कार्यालयाकडून तळवडे येथील एका इमारतीच्या 40 घरगुती व व्यापारी वीज जोडणीसाठी 127 किलो व्हॅट वीज भार मंजूर करण्यात आला होता. त्यासाठी महावितरणच्या एनएससी योजनेंतर्गत 100 केव्हीए ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढवून त्याठिकाणी 200 केव्हीए ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.



> पुणे प्रादेशिक कार्यालया अंतर्गत येणाऱ्या तीन झोनपैकी केवळ पुण्यातच मनमानी पध्दतीने कामे केली जात आहेत. इतर कोणत्याही झोनमध्ये असा नियमाने काम सुरु असल्याचे दिसत नाही. प्रभारी संचालकाच्या मनमानीला चाप लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही
>
> \- संतोष सौंदणकर, पिंपरी-चिंचवड शहर संघटक, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)

परंतु, ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढविणेचे काम झाले नसतानाही तळवडे शाखा अभियंता यांनी 40 पैकी 22 वीज जोडण्यांना वीज मीटर बसविले आहेत. नागरिकांचा व ग्राहकांचा जीव धोक्यात घालून वीज जोडण्या दिल्या आहेत.

पुणे प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी संचालक हे 25 लाखांपेक्षा अधिक अंदाजपत्रकाची तपासणी करण्यास सांगत आहेत. स्वखर्चाने केलेल्या एक पूर्णांक तीन टक्के कामाची तपासणी करण्यासाठी प्रादेशिक कार्यालयातील अधिकाऱ्यांना पाठवत आहेत. वास्तविक कुठल्याही प्रादेशिक कार्यालयात असा नियम अस्तित्वात नाही.

याबाबत महावितरणकडून माहिती बाहेर जावू नये याकरिता प्रचंड धडपड करण्यात आली. महावितरण मध्ये अनेक वेळा अशा प्रकारचे प्रकरण घडत असताना महावितरणचे उपकार्यकारी अभियंता यांनी याकडे जातीने लक्ष देणे गरजेचे होते.

### आर्थिक फसवणूक करत वीज कंपनीचे नुकसान

» माहिती अधिकारात मिळालेल्या दस्तावेजानुसार माहितीनुसार, नियमानुसार 127 किलो व्हॅट लोडची मंजुरी असताना शाखाधिकारी यांनी अर्जदाराला फक्त 40किलो व्हॅट इतक्या लोडचे शुल्क भरण्याची चलने दिली. अर्जदाराने चलने भरल्यावर नियमानुसार ट्रान्सफॉर्मर बसविल्यानंतर वीज जोडण्या दिल्या जाणे अपेक्षित असताना, शाखाधिकारी यांनी प्राधिकरण उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने 22 वीज जोडण्याचे वीज मीटर जागेवर बसविले जे देखील आर्थिक फसवणूक करत वीज कंपनीचे नुकसान केल्याच्या गुन्ह्याच्या कक्षेत येते.

# हाइट बॅरियरने अडवली अग्निशामकची वाट

## आकुर्डी येथून वळसा घालून अग्निशामक बंबाला घटनास्थळी दाखल व्हावे लागते

**पिंपरी | प्रतिनिधी**

कितीही वाहतूक कोंडी असली तरी अग्निशामकच्या बंबाचा आवाज ऐकल्यानंतर त्या गाडीला प्रथम वाट करून दिली जाते. मात्र चिंचवड स्टेशन येथून चिंचवडगावाकडे जाणाऱ्या मार्गावर उभारलेल्या हाइट बॅरियरने अग्निशामकची वाट अडविली आहे. यामुळे आकुर्डी येथून वळसा घालून अग्निशामक बंबाला घटनास्थळी दाखल व्हावे लागते.

चिंचवडगाव किंवा आसपासच्या परिसरात आग लागल्यानंतर प्राधिकरण किंवा थेरगाव अग्निशामक उपकेंद्रातून बंब येतो. तसेच त्यासोबत अग्निशामक मुख्यालयातूनही एक बंब घटनास्थळी दाखल होतो. मात्र यासाठी वीस मिनिटांचा कालावधी लागतो. तोपर्यंत आग रौद्ररूप धारण करू शकते. त्यामुळे चिंचवडगावात अग्निशामक उपकेंद्र असणे अत्यंत गरजेचे आहे.



चिंचवडगाव येथील अहिंसा (एलप्रो) चौकात अनेक खासगी आराम बसेस उभ्या राहतात. तसेच चिंचवडगाव परिसरात मालवाहतूक करणारी अवजड वाहने येऊ नये, यासाठी चिंचवड स्टेशन येथे हाइट बॅरियर उभारण्यात आले आहे. यामुळे चिंचवडगाव परिसरात चिंचवड स्टेशन वरून येणारी 'पीएमपीएमएल'ची बस देखील येणे बंद झाले आहे.

या बस सध्या आकुर्डीतील खंडोबा चौक परिसरातून वळून चिंचवडगावाकडे येतात. बसेस किंवा इतर वाहने यांना वळसा घालून आले तरी चालू शकतात. मात्र अग्निशामक दलाच्या बंबाचे तसे नाही. आग लागल्यानंतर त्यांना त्वरित घटनास्थळी पोहचणे गरजेचे असते.

सध्या चिंचवड स्टेशन येथे हाइट बॅरियर उभारण्यात आल्याने अग्निशामक दलासमोर घटनास्थळी पोहचण्यासाठी तीन पर्याय आहेत. पहिला पर्याय म्हणजे आकुर्डी खंडोबा माळ येथून लांबचा वळसा घालून चिंचवडगाव परिसरात येणे. यासाठी मोठ्या प्रमाणात वेळ वाया जातो. पर्याय पिंपरी-चिंचवड लिंक रोडने घटनास्थळी दाखल होणे

या मार्गावरती मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी असते. त्यामुळे घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. तिसरा पर्याय अत्यंत धोकादायक आहे. चिंचवड स्टेशन येथे चिंचवड गावाकडे जाणाऱ्या मार्गावर हाइट बॅरियर उभारण्यात आला आहे. मात्र चिंचवडगावाकडून चिंचवड स्टेशनकडे येणाऱ्या मार्गावरती असे कोणतेही बंधन नाही.

### खासगी, एसटी बसही 'नो-एन्ट्री'तून

» काही महिन्यांपूर्वी चिंचवड रेल्वे पुलावर दुरुस्तीचे काम करण्यात आले. यावेळी हा हाइट बॅरियर उभारण्यात आला आहे. मात्र काम पूर्ण झाल्यानंतरही हा हाइट बॅरियर तसाच ठेवण्यात आला आहे. सकाळच्या वेळी वाहनांची वर्दळ कमी असताना अनेक खाजगी बस चालक, एसटी बसेस किंवा कंपन्यांच्या बसेस नो एंट्रीतून चिंचवडगावाच्या दिशेने जातात. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# अवकाळी वादळाने शेतकऱ्यांचे नुकसान

## पत्राशेड, सौरप्लँट उडाले, झाडे उन्मळली : विजेचे खांब पडल्याने बत्ती गुल

**पुणे | प्रतिनिधी**

निमसाखर (ता. इंदापूर) हद्दीतील रणमोडेवस्ती व परिसरात रविवारी (दि. 19) रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी अल्प पाऊस झाला. शेतकऱ्यांच्या शेतातील पत्राशेड, सौरप्लँट उडाले. नारळाची झाडे पडली तर मुख्य विद्युत वाहिनीचे खांब पडल्याने दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत निमसाखर उपकेंद्र परिसरात विद्युत बंदमुळे नागरिक हैराण झाले होते.

इंदापूर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील निमसाखर व परिसरातील वाड्यावरत्यांवर वादळी वाऱ्यासह अल्प पाऊस झाला. रविवारी सायंकाळी पाचच्या सुमारास वादळी वाऱ्याला सुरुवात होत दरम्यान अवकाळी अल्प पाऊस या परिसरात झाला. दरम्यान निमसाखर गावच्या हद्दीत असलेल्या रणमोडे वस्ती परिसराला मोठ्या प्रमाणावर या वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसामुळे फटका बसला.

नानासाहेब व राजेंद्र सर्जेराव रणमोडे बंधुंबरोबरच दत्तात्रय यशवंत सूर्यवंशी यांचे देखील सौर ऊर्जेचे प्लँट उद्ध्वस्त होत, सौर प्लेटा शंभर मीटर अंतरावर जाऊन विखुरलेल्या स्वरुपात इकडेतिकडे पडल्या. घराजवळ उभ्या असलेल्या दुचाकी गाड्या देखील धडाधड पडल्याच्या थरार सांगताना अंगावर काटा उभा राहत होता.

येथीलच निलेश देवराव मोरे यांच्या घराजवळील गाडीसाठीचे पत्राशेडचे पत्रे उडून लगत असलेल्या घरावरील सिमेंट पत्र्यावर पडून सिमेंट पत्र्याला मोठ्या प्रमाणावर तडे गेले. काही घराची पाने उडून गेली.

याचबरोबर घराजवळ असलेली तीन नारळाची झाडे या जबरदस्त वादळामध्ये जमीनदोस्त झाली. याचबरोबर निलेश देवराव मोरे व बाळासाहेब मोहिते यांच्या शेतातील डाळिंब फळबाग क्षेत्रामध्ये अनेक झाडे उन्मळून पडली. तर लागलेल्या डाळिंबाची फळे खाली पडून मोठे नुकसान झाले.

या वस्ती लगतच असलेल्या बाल गणेश मंडळाचा शेड सुध्दा यामध्ये वाचू शकले नसून हे पत्राशेडचे मोठे नुकसान झाले. सध्या आंब्याचा हंगाम असून या वादळी वाऱ्यामुळे ठिकठिकाणी आंब्याच्या झाडाखाली पडलेल्या आंब्याची रास पाहायला मिळत होती.



### वीज नसल्याने पाण्याचेही हाल

» शेतकऱ्यांचा शेतीबरोबर जोडधंदा म्हणून गोपालनाचा धंदा म्हणून ओळखला जातो. मात्र या धंद्यामध्ये जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी लाईटच नसेल तर जनावरांना पाणी पाजायचे कसे? असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. दुसरीकडे विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी उन्हाची परवाना करता विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. या दोन्हीमध्ये मात्र नागरिकांना पिण्याचे पाण्याचे व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत आहे.

### पंचनामे सुरु

» रनिमसाखर हद्दीतील रणमोडेवस्ती परिसरात नुकतेच झालेल्या वादळी वाऱ्यामुळे परिसरातील घरे, फळ झाडे, सौर विद्युत पॅनल, पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे तीव्रता ओळखून निमसाखर तलाठी कार्यालयाकडून नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यास सुरुवात केली. याबद्दल महसूल विभागाचे आभार व्यक्त करत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल या दृष्टिकोनातूनही प्रयत्न व्हावेत अशी मागणी प्रगतशील शेतकरी निलेश देवराव मोरे यांनी केली.

# सावधान! स्वीट होममधून मिठाई घेताय जरा जपून

## फास्ट फूड, जंक फूडच्या नावाखाली दर्जाहिन पदार्थ : मिठाईत मेलेली अळी सापडल्याचा धक्कादायक प्रकार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नगर महामार्गावर रस्त्याच्या कडेला असणाऱ्या गावात स्वीट होमचा सुळसुळाट झाला असून यामध्ये मोठ्या प्रमाणात फास्ट फूड, जंक फूडच्या नावाखाली दर्जाहिन पदार्थ विकले जातात. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रांजणगाव येथील एका स्वीट होममधून मुलांना खाण्यासाठी नेलेल्या मिठाईत मेलेली अळी सापडल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच समोर आला आहे.

शिरुर तालुक्यात सध्या झपाट्याने औद्योगिकीकरण वाढतं असुन महाराष्ट्रासह बाहेरच्या राज्यातून कामगार वर्ग औद्योगिक वसाहतीत पोटाची खळगी भरण्यासाठी येत आहे. शिरुर तालुक्यात कोरेगाव भिमा, वढु बुद्रुक, सणसवाडी, शिक्रापुर, कोंढापुरी, रांजणगाव गणपती आणि करडे परिसरात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या उभ्या राहिल्या असुन त्यामध्ये लाखो कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

त्यामुळे या औद्योगिक वसाहतीच्या परीसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वीट होम आणि छोटया छोटया टपऱ्यावर फास्ट फुड तसेच जंक फुड खाण्यासाठी लोक गर्दी करत आहेत. परंतु यामध्ये मिळणारे खाद्यपदार्थ दर्जेदार आहेत का? याची खात्री न करताच सर्वसामान्य लोक हे खाद्यपदार्थ खाऊन स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत. परंतु त्यामुळे गंभीर आजारांना निमंत्रण मिळत आहे. त्यामुळे स्वीट हो म किंवा टपरीवरुन कोणताही खाद्यपदार्थ विकत घेताना त्याचा दर्जा तपासणे गरजेचे आहे.

रांजणगाव गणपती येथील जय भवानी मिठाईवाले या स्वीट होममधून 14 मे रोजी एका ग्राहकाने लहान मुलांना खायला मिठाई नेली होती. त्यामध्ये मेलेली अळी सापडल्याने त्या ग्राहकाने याबाबत स्वीट होम चालविणाऱ्या व्यक्तीला याबाबत जाब विचारला. त्याने सुरवातीला उडवाउडवीची उत्तर दिली; मात्र काही सामाजिक का र्यकर्त्यांनी याबाबत आवाज उठविल्यानंतर मात्र स्वतःची चूक मान्य करत मिठाईत मेलेली अळी असल्याचे मान्य केले.



### अन्न, औषध विभागाची डोळेझाक... ?

» पुणे जिल्ह्यासह शिरुर तालुक्यात हा सगळा सावळा गोंधळ चालु असताना अन्न आणि औषध प्रशासन विभाग याबाबत डोळेझाक कां करत आहे, असा प्रश्न सर्वसामान्य नागरीकांना पडला आहे. शिरुर तालुक्यात जेवढे स्वीट होम आहेत. त्यांच्याकडे फूड लायसन्स आहेत का? त्यामध्ये पदार्थ दर्जेदार बनवले जातात का? याची तपासणी होणे गरजेचे आहे. अन्यथा फास्ट फूड आणि जंक फूडच्या नावाखाली दर्जाहीन पदार्थ विकून सर्वसामान्य ग्राहकांच्या आरोग्याशी चाललेला हा खेळ थांबणार कधी असा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संर्पक साधला असता उडवा उडवीची उत्तरे देऊन प्रतिक्रिया देण्याचे टाळले.